वर्ष : ०४, अंक : २५४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध




बुलडाणा, शुक्रवार, दि.२५ एप्रिल २०२५




## नागरिकांनो सावधान ! सूर्यनारायण कोपलाय !!



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, चंद्रपूर :** विदर्भात चंद्रपूर जिल्हातील ब्रम्हपुरीचे आज सर्वाधिक होते. पारा ४५.९ अंशावर पोहचला.अकोला जिल्हावरही सूर्य प्रकोप झाला. अकोल्याचे तापमान ४५.२ अंश होते. या आठवड्यात सलग दोनदा जगातील सर्वाधिक उष्ण शहर ठरलेलल्या चंद्रपूरचा तापमाणात काहीशी घट झाली.चंद्रपूरचे तापमान ४५ अंश होते.चंद्रपूर जिल्हातील काही भागात तापमानाचा पारा वाढलेला असताना काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस बरसला आहे.

चंद्रपूर आणि चंद्रपूर जिल्हात येणारे ब्रम्हपुरीसाठी एप्रिल महिना तापदायक ठरत आहे. या आठवड्यात चंद्रपूर पुन्हा एकदा सर्वाधिक उष्ण शहर ठरले तर एकदा देशातील सर्वाधिक तापम ानाची नोंद चंद्रपूरच्या नावाने नोंदवल्या गेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात येणाऱ्या ब्रह्मपुरी शहराने आज चंद्रपूरलाही मागे टाकले आहे. विदर्भातील सर्वाधिक तापमान आज ब्रह्मपुरीचे होते. पारा ४५.९ वर पोहचला.

मराठवाड्यातही तशीच परिस्थिती आहे. नांदेड, परभणी येथे ४४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. तर, बीडमध्ये पारा ४३.४ आणि धाराशिव येथे ४२ अंशावर गेला आहे. पुण्यात ४१.२ अंश सेल्सियस तापमान नोंदवण्यात आलं आहे. अहिल्यानगर येथे ४०.९, नाशकात ४०.२, तर सोलापुरात ४३.८ इतकं तापमान नोंदवण्यात आलं आहे. मुंबई आणि उपनगरांमध्येही प्रचंड उकाडा जाणवू लागला आहे.

**विदर्भावर सूर्य कोपला !**

खरंतर विदर्भासाठी उन्हाळा नेहम ीच तापदायक ठरतो. सूर्य अक्षरश: येथे आग ओकत असल्याचा भास होतो.दुपारच्या सुमारास घराच्या बाहेर जाणे जीवावर येते. ही स्थिती असते मे महिन्यात. मात्र, यावर्षी एप्रिल म हिन्यातच ही उष्णता नकोशी झाली आहे. दुपारच्या वेळेस रस्ते ओस पडल्याचे दिसून येत आहे. घरातील कुलर-एसी काम करेना अशी स्थिती उद्भवली आहे.

दुसरीकडे, जिल्हातील काही भागात वादळी पावसासह गारपीट झाली आहे. वादळाने अनेक घरांवरील छते उडाली. मार्गांवरील झाडे कोसळली. या पावसामुळे मका, भाजीपाला, मिरची पिकाला मोठा फटका बसला आहे. तर, उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना काहीसा दिलासा मिळाल्याचं वाटत असलं तरी उकाडा काही कमी झालेला नाही. मे महिन्यात यापेक्षाही भयंकर स्थिती असेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

## थोडक्यात

### 'दिशा' बैठकीत बारडच्या अस्वच्छतेचा प्रश्न गाजला ! निष्क्रिय ग्रामसेवकांची तातडीने बदली करा...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२४, मुदखेड (नांदेड) :** केंद्र सरकारच्या दिशा समितीच्या बैठकीत अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण यांनी बारड येथील अस्वच्छतेचा प्रश्न फैलावर घेत अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या निष्क्रिय ग्रामसेवकांची तातडीने बदली करण्याची मागणी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्याकडे केली. खा. रवींद्र चव्हाण यांची आक्रमक भूमिका बघताच संबंधित गंभीर प्रश्नावर कावली यांनी ठोस कारवाईचा दुजोरा दिला.जिल्ह्यातील केंद्र सरकारच्या विविध योजना संदर्भात दिशा समिती आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. दिशा समितीचे अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण अध्यक्षस्थानी होते. सह अध्यक्ष खासदार शिवाजी काळगे, खा. नागेश पाटील आष्टीकर, खा. अशोक चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, खा. अजित गोपछडे, आ. श्रीजया चव्हाण, आ. भीमराव केराम, आ. राजेश पवार आ. आनंद बोंढारकर यांच्या सह आदींची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत केंद्र सरकारच्या विविध योजनेत प्रामुख्याने पाणीपुरवठा योजना, आरोग्य विषयक प्रश्न, शैक्षणिक आढावा तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छतेचा प्रश्न याविषयी चर्चा करण्यात आली.या बैठकीत अशा समितीचे अध्यक्ष खा. रवींद्र चव्हाण यांनी अस्वच्छतेचा प्रश्न फैलावर घेतला. मुदखेड तालुक्यातील बारड येथील विविध नगरामधील अस्वच्छता, तुंबलेल्या गटारांचा प्रश्न, याविषयी खा रवींद्र चव्हाण आक्रमक झाले. खा. चव्हाण यांनी बारड येथील ग्रामसेवक गेल्या आठ वर्षांपासून कार्यरत असून निष्क्रिय ठरलेल्या ग्रामसेवकांची तातडीने बदली करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांना दिले आहेत. स्वच्छतेच्या प्रश्नावर जिल्हा प्रशासनाला खा. रविंद्र चव्हाण यांनी धारेवर धरताच योग्य कारवाईचे संकेत दिले. यासोबतच खा. रवींद्र चव्हाण यांनी बारडच्या प्रस्तावित १३२ के व्ही केंद्राची लवकरात लवकर उभारणी करावी अशा सूचनाही महावितरण अधिकाऱ्यांना दिल्या.

## मुख्यमंत्र्यांकडून पहलगाम दहशतवादी हल्लूयात मृत पावलेल्या डोंबिवलीतील तिघांना श्रद्धांजली



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, डोंबिवली :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्लयात मृत्युमुखी पडलेल्या तीन जणांना बुधवारी रात्री डोंबिवलीत हजारो शोकाकुल नागरिकांनी भगशाला मैदानात एकत्रित येत अश्रूंच्या साक्षीने अखेरचा निरोप दिला. अतिरेक्यांच्या या पूर्वनियोजित आणि घृणास्पद हत्याकांडाम ुळे संपूर्ण शहरात शोककळा पसरली आहे. मात्र जनतेत दहशतवादाविरुद्ध तीव्र असंतोष आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्लयात डोंबिवली शहरातील मृत पावलेल्या हेमंत जोशी, संजय लेले आणि अतुल मोने यांच्या पार्थिवाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंत्यदर्शन घेतले व त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे, माजी खासदार जगन्नाथ पाटील, आमदार सुलभा गायकवाड, माजी मंत्री रवींद्र चव्हाण, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पोलीस सहआयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी घटनास्थळी भेट देऊन पीडितांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. नागरिकांनी एकापाठोपाठ एक येत आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्याने वातावरणात कमालीची शांतता आणि दुःख पसरले होते. मुख्यमंत्र्यांच्या भेटीदरम्यान संतप्त नागरिकांनी पाकिस्तानविरोधात जोरदार घोषणाबाजी केली आणि सर्व पाकिस्तानी उत्पादनांवर पूर्णपणे बंदी घालण्याची मागणी केली. अनेकजण भावुक होऊन फडणवीस यांना म्हणाले, फक्त तुम्हीच आम्हाला न्याय देऊ शकता. रात्री ९:०० च्या सुमारास फुलांनी सजलेल्या वाहनांम धून या तिघांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी नेण्यात आले. यापूर्वी हजारो शोकाकुल नागरिकांच्या उपस्थितीत मोठी अंत्ययात्रा काढण्यात आली. भावपूर्ण श्रद्धांजली असे मोठे बॅनर वाहनावर लावण्यात आले होते, ज्यावर मृतांची नावे आणि छायाचित्रे होती. ही अंत्ययात्रा डोंबिवलीतील डॉमिनोज पिझ्झा, एम. जी. रोड, डोंबिवली स्टेशन (पश्चिम), कोपर रोड, कोपर ब्रिज, टंडन रोड, आर. पी. रोड या प्रमुख मार्गांवरून गेली आणि शेवटी शिव मंदिर रोडवरील स्मशानभूम ीत या तिघांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. हजारो नागरिक यावेळी आपल्या भावनांना आवरू शकले नाहीत.

अंत्यसंस्कारापूर्वी भगशाला मैदानात स्मशान शांतता पसरली होती, कारण शोकाकुल नागरिक शांतपणे शवपेट्यांजवळून जात होते. अनेकजण स्तब्ध उभे होते, तर काहींच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. या घटनेमुळे सम ुदायाला बसलेला मोठा मानसिक आघात वातावरणात स्पष्टपणे जाणवत होता. यापूर्वी, जेव्हा पार्थिव विमानतळावर पोहोचले, तेव्हा अनेक वरिष्ठ नेते आणि मंत्र्यांनी राज्याच्या वतीने पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

दरम्यान, ठाणे जिल्हा प्रशासनाने रात्री उशिरा जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, जिल्ह्यातील १५६ पर्यटक अजूनही जम्मू आणि काश्मीरमध्ये अडकले आहेत. विशेष विमाने आणि गाड्यांच्या माध्यमातून त्यांची घरवापसीची व्यवस्था केली जात आहे आणि ती उद्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे. या दहशतवादी हल्लयाच्या पार्श्वभूमीवर डोंबिवलीकरांनी समस्त देशवासियांना न्याय देण्याची तसेच दहशतवादावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## यूपीएससी'त नागपूरचा डंका; ९ विद्यार्थ्यांची बाजी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नागपूर :** केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) नागरी सेवा परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर झाला असून, या निकालात नागपूरच्या नऊ विद्यार्थ्यांनी यश मिळविले. जिद्द, चिकाटी आणि निर्धार यांच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. या यशस्वी उमेदवारांमध्ये जयकुमार आडे (रँक ३००), श्रीरंग कावरे (३९६), राहुल आत्राम (४८१), सर्वेश बावने (५०३), सावी बाळकुंडे (५१७), अपूर्व बालपांडे (६४९), सौरभ येवले (६६९), नम्रता ठाकरे (६७१), भाग्यश्री नाइकाळे (७३७) यांचा समावेश आहे.

यूपीएससी परीक्षेत यश प्राप्त करणारे हे विद्यार्थी विविध सामाजिक पार्श्वभूमीतील असून त्यांनी दीर्घकालीन अभ्यास, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर हे यश प्राप्त केले आहे. त्यांचे कुटुंबीय, शिक्षक आणि मार्गदर्शक यांच्यासाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण ठरला आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवत वेळेचे योग्य नियोजन करून अभ्यास केला. अनेकांनी यापूर्वी अपयशाचा साम ना केला; मात्र अपयशाने खचून न जाता त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले.

देशसेवा करण्याची तीव्र इच्छाशक्ती आणि समाजात बदल घडवण्याची तळमळ त्यांच्या प्रयत्नांमागे होती. दरवर्षी महाराष्ट्रातील २५० ते ३०० विद्यार्थी यूपीएससीच्या मुलाखतीला जातात. यापैकी ३३ टक्के विद्यार्थी यशस्वी होतात. प्रशिक्षण केंद्रातील ९ आणि इतर विद्यार्थीही यात असू शकतात. त्यांच्या यशामुळे नागपूरमधील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल आणि नागरी सेवा परीक्षेकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक बनेल, असा विश्वास भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. प्रमोद लाखे यांनी व्यक्त केला.

**महाराष्ट्राचा टक्का वाढतोय**

देशातील सर्वात स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यूपीएससीमध्ये दरवर्षी लाखो इच्छुकांचा सहभाग दिसून येतो. ही परीक्षा भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलिस सेवा (आयपीएस), भारतीय परराष्ट्र सेवा (आयएफएस), भारतीय महसूल सेवा, भारतीय व्यापार सेवा आणि इतर गट 'अ' आणि 'ब' केंद्रीय सेवांसारख्या प्रतिष्ठित पदांसाठी प्रवेशद्वार म्हणून घेण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यंदाही केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत यूपीएससी परीक्षा घेण्यात आली होती.

या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून महाराष्ट्राने बाजी मारली आहे. २०२४मध्ये झालेल्या यूपीएससी प्रिलिम परीक्षेत १६ लाख विद्यार्थ्यांमधून १४ हजार ५०० विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. त्यापैकी मुख्य परीक्षेत २ हजार ८५० विद्यार्थ्यांनी बाजी मारली. मुलाखतीनंतर १ हजार ५६ विद्यार्थी यूपीएससीत उत्तीर्ण झाले. नागपूरच्या नऊ विद्याथ्यर्थ्यांसह गोंदियाच्या सचिन बिसेन आणि अम रावतीच्या शिवांग तिवारी या विद्यार्थ्यांचे नावही स्पर्धा परीक्षेत झळकले. या परीक्षेत महाराष्ट्राचा टक्का वाढत असल्याचे डॉ. लाखे यांनी सांगितले.

## नाशिकच्या 'त्या' १२ पुलांचे ऑडिट...
## सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचा निर्णय




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, नाशिक :** प्रयागराज येथे झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेच्या पार्श्वभूम ीवर नाशिकमध्येही सिंहस्थात दुर्घटना होऊ नये यासाठी महापालिकेने गोदावरी, नासर्डी आणि वालदेवी या तीन नद्यांवरील जवळपास १२ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे. सिंहस्थ आराखड्याला मंजुरी मिळाल्यानंतर निविदा काढून तज्ज्ञांमार्फत पुलांचा अहवाल येऊन कारवाई केली जाणार आहे. दरम्यान, अद्याप आराखडा मंजूर नसल्यामुळे या स्ट्रक्चरल ऑडिटबाबतही आता शंका उपस्थित केल्या जात आहेत.

नाशिकमध्ये सन २०२७ मध्ये होत असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्यात पाच ते दहा कोटी भाविक येण्याचा अंदाज आहे. प्रयागराज येथे झालेली भाविकांची गर्दी पाहता नाशिकमध्येही होणाऱ्या सिंहस्थातदेखील गर्दी वाढणार आहे. त्यामुळे या दृष्टीने प्रशासनाने नियोजन सुरू केले आहे. प्रयागराज या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये गर्दी झाल्यानंतर कोलमडलेले व्यवस्थापन, चेंगराचेंगरीसारख्या घटनेमध्ये भाविकांचा झालेले मृत्यू बघता प्रशासनाने आता नियोजनाचे सर्व अंदाज बदलले आहेत. त्यानुसार १० कोटी भाविक पर्वणी वर्षांमध्ये येतील, असे अंदाज बांधून नियोजन केले जात आहे. महापालिकेने या कामांसाठी १५ हजार कोटींचा आराखडा शासन दरबारी सादर केला असून, त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. परंतु, गर्दीचे नियोजन करण्यासह संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी गोदावरी, नासर्डी आणि वालदेवी नदीवरील पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. दरम्यान, ही तपासणी करून उपाययोजनांबाबत अहवाल पालिकेला दिला जाणार आहे.

**या पुलांचे होणार ऑडिट**

**गोदावरी नदी :** अहिल्यादेवी होळकर पूल, रामवाडी पूल, लक्ष्मण पूल, रामसेतू, गाडगे महाराज, लक्ष्मीनारायण पूल.

**नासर्डी :** सातपूर आयटीआय, मिलिंदनगर, भाभानगर, हॉटेल क्वालिटी इनजवळ, रामदास स्वामी आश्रम. यांसह वालेदवी नदीवरील लहान पूल.

# संपादकीय



## सार्वभौमत्वावर हल्ला !

काश्मीरला विशेष दर्जा देणारे ३७० वे कलम हटवून केंद्र सरकारने काश्मीरचे त्रिभाजन केले. या घटनेला या ऑगस्ट मध्ये सहा वर्ष पूर्ण होतील. ३७० वे कलम हटवल्यानंतर काश्मीरमध्ये अनुचित प्रकार घडू नये यासाठी काश्मीरमध्ये कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. कडेकोट सुरक्षा व्यवस्था असल्याने काश्मीरमध्ये बराच काळ शांतता होती त्यामुळे पर्यटनालाही चालना मिळाली होती. त्यामुळे नंदनवनात पुन्हा शांतता प्रस्थापित झाली असा समज निर्माण झाला होता मात्र या समजाला छेद देणारी घटना काश्मिरात घडली आहे. जम्मू काश्मीरमधील अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ पर्यटक ठार झाले. या हल्ल्यात अनेक पर्यटक जखमी झाले. ठार झालेल्या पर्यटकात महाराष्ट्रातील सहा पर्यटकांचा समावेश आहे. या हल्ल्याने देशभर संतापाची लाट उसळली आहे . पहलगाम येथे झालेला हा हल्ला भारताच्या सार्वभौमत्वावर झालेला हल्ला आहे. या हल्ल्याने काश्मीरमध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा डोके वर काढले असून काश्मीरमध्ये पुन्हा घातपाती कारवाया सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने सहा वर्षापूर्वी काश्मीरमधीलच पुलवामा येथे झालेल्या हल्ल्याची आठवण झाली. सहा वर्षापूर्वी पाकिस्तानच्या जैश ए मोहंमद या दहशतवादी संघटनेने भारतीय जवानांवर केलेल्या हल्ल्यात ४० हून अधिक जवान शहीद झाले होते. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात दहशतवाद्यांनी पर्यटकांना त्यांचा धर्म विचारुन ठार केले. दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांना जाणीवपूर्वक टार्गेट करून ठार केले. याचाच अर्थ हा टार्गेट कीलींगचा प्रकार आहे. काश्मीरमध्ये टार्गेट किलिंगचा हा पहिलाच प्रकार आहे असे नाही. मागील वर्षी जम्मू काश्मीरच्या दिवसी जिल्ह्यातील कंदा परिसरात वैष्णवदेवीच्या दर्शनासाठी जात असलेल्या भाविकांच्या बसवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता त्यात १० भाविक मरण पावले तर ३३ हून अधिक भाविक जखमी झाले होते. पहलगाम येथे झालेला हल्ल्याला गेल्या काही दिवसात काश्मीरमध्ये झालेला सर्वात मोठा भीषण हल्ला म्हणता येईल अर्थात काश्मीर खोऱ्यात कडेकोट बंदोबस्त असूनही लहान मोठे हल्ले चालूच होते मात्र या हल्ल्याने काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवादी मोठ्या प्रमाणात सक्रिय झाल्याचे स्पष्ट झाले आहे. या हल्ल्याने दहशतवाद्यांनी केंद्र सरकारला दाखवून दिले आहे की काश्मीरमध्ये दहशतवाद अजूनही कायम आहे. केंद्र सरकारने हा हल्ला गांभीर्याने घेतला असून या हल्ल्याची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे पंतप्रधान, गृहमंत्री, संरक्षणमंत्र्यांनी हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच असून या हल्ल्याला जशास तसे उत्तर दिले जाईल असा इशारा दिला आहे. पाकिस्तानने मात्र हे पाप आमचे नाही असे म्हटले आहे. पाकिस्तान काहीही म्हणो मात्र हा हल्ला पाकिस्तान पुरस्कृतच होता हे शाळकरी मुलेही सांगतील. सुंब जळाला तरी पिळ जात नाही ही म्हण पाकिस्तानसाठी तंतोतंत लागू पडते. पाकिस्तान आज अक्षरशः भिके कंगाल झाला आहे. पाकिस्तानी सरकार कटोरा घेऊन जगभर फिरत आहे मात्र त्यांना कोणीही भिक द्यायला तयार नाही . पाकिस्तानमधील जनता अक्षरशः देशोधडीला लागली आहे. एकवेळचे पोटभर अन्न मिळाले तरी पुरेसे अशी त्यांची अवस्था आहे. आपल्या देशातील नागरिकांना खायला मिळत नसताना तेथील सरकार मात्र दहशतवाद्यांना पोसत आहे. पाकिस्तान सरकार आजही दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करत आहे. पाकिस्तानच्या सीमावर्ती भागात आजही दहशतवाद्यांचे अड्डे सुरू आहेत. तिथे पाकिस्तानी लष्कर दहशतवादी संघटनांना प्रशिक्षण देत आहे. अनेक दहशतवादी संघटनांची कार्यालये पाकिस्तानात आहेत अशाच एका दहशतवादी संघटनेने हा भ्याड हल्ला केला असण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारने या भ्याड हल्ल्याची गांभीर्याने दखल घेऊन पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यावे. जर भारताने या दहशतवादी हल्ल्याला प्रतिउत्तर दिले नाही तर दहशतवाद्यांची मुजोरी आणखी वाढेल आणि काश्मीरमध्ये पुन्हा दहशतवाद पसरेल. ते होऊ द्यायचे नसेल तर भारतानेही आक्रमक व्हायला हवे. प्रसंगी सर्जिकल स्ट्राईक सारखा पर्याय वापरायलाही हरकत नाही. भारताने पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच या दहशतवाद्यांना साथ देणाऱ्या फुटिरतावाद्यांचा देखील बंदोबस्त करावा. काश्मीरमधील अनेक फुटीरतावादी नेते दहशतवाद्यांना साथ देतात. स्थानिक फुटीरतावादी लोकांची साथ असल्याशिवाय इतका मोठा हल्ला करणे दहशतवाद्यांना शक्य नाही त्यामुळे दहशतवाद्यांशी दोन हात करताना आणि पाकिस्तानला जशास तसे उत्तर देतानाच केंद्र सरकारने ही फुटिरतावादी कीड देखील मुळापासून उखडून टाकायला हवी. आज जरी हा दहशतवादी हल्ला भारतात झाला असला तरी दहशतवाद ही केवळ भारताचीच समस्या नाही तर ती वैश्विक समस्या आहे. दहशतवाद आज जगातील प्रत्येक देशाचे दार ठोठावत आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी जपान, रशिया, ऑस्ट्रेलिया या प्रगत देशांनाही दहशतवादाची झळ बसली आहे म्हणूनच दहशतवादाचा मुकाबला करायचा असेल तर जगातील सर्व देशांना एकत्र यावेच लागेल. पाकिस्तान सारखा देश जो सातत्याने दहशतवादाला प्रोत्साहन देतो, दहशतवाद्यांना मदत करतो अशा देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने कारवाई करावी. पाकिस्तान सारख्या दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांवर आंतरराष्ट्रीय समूहाने आर्थिक निर्बंध आणावेत. प्रसंगी त्या देशांवर बहिष्कार टाकून त्यांची कोंडी करावी. दहशतवाद्यांना मदत करणाऱ्या देशांची कोंडी केल्याशिवाय दहशतवाद संपणार नाही. अमेरिकेसारख्या सुपर पॉवर देशांनी त्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.

# दहशतवादाविरुद्ध सामूहिक लढा आवश्यक

पहेलगाममधील 'छोटे स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बैसरन भागात मंगळवारी अतिरेक्यांनी पर्यटकांना लक्ष्य केले. या हल्ल्यात किमान २६ पर्यटकांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. 'पृथ्वीवरील स्वर्ग' अशी ओळख असलेल्या जम्मू काश्मीर राज्यात यंदा प्रथमच देशी-विदेशी पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे सांगण्यात येते. असे असताना, मंगळवारी पहेलगाम शहरापासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या बैसरन या गवताळ पठारावर अतिरेक्यांनी हा नियोजित हल्ला केला. मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास अनेक पर्यटक निसर्गाचा आनंद लुटत असताना, किमान पाच अतिरेक्यांनी त्यांच्यावर गोळीबार केला. पर्यटकांना मुद्दामहून लक्ष्य करण्यात आले होते. गोळीबार केल्यानंतर अतिरेकी घटनास्थळावरून पसार झाले. 'द रेसिडन्स फ्रंट' (टीआरएफ) या संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

जम्मू-काश्मीरमधील हिंसाचाराला कारणीभूत असणाऱ्या बहुतांश दहशतवादी संघटनांचे केंद्र पाकिस्तानमध्ये असते. या संघटनांना लष्करी प्रशिक्षण व आर्थिक मदत पाकिस्तानकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या मिळते. पाकिस्तानातून घुसखोरी करून आलेले प्रशिक्षित दहशतवादी जम्मू-काश्मीरमध्ये निष्पाप लोकांची हत्या करत असतात. १९८९ पासून जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानपुरस्कृत सीमापार दहशतवादामुळे लाखो निष्पाप भारतीय नागरिक मारले गेले आहेत.

दहशतवाद ही हिंसाचाराच्या तत्त्वावर आधारलेली विचारसरणी आहे. त्यातून भीती व दहशतीचे वातावरण निर्माण केले जाते. हत्या, अपहरण,गोळीबार, धमक्या अशा पद्धतींचा वापर करून आपले उद्दिष्ट साध्य करण्याचा हे दहशतवादी गट प्रयत्न करत असतात.दहशतवादामुळे त्या भागातील आर्थिक विकासाची प्रक्रिया मंदावते. नागरिकांना मूलभूत मानवी हक्क उपभोगता येत नाहीत आणि आवश्यक सुविधा मिळवणे येथील लोकांना कठीण जाते.

खरंतर, दहशतवाद ही संकल्पना दुसऱ्या महायुद्धानंतर उदयास आली. आपली राजकीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी निष्पाप लोकांच्या हिंसेचा मार्ग अनेक संघटनांनी स्वीकारला. दुसऱ्या महायुद्धानंतर सुरू झालेल्या अमेरिका व सोविएत रशियामधील शीतयुद्धाच्या राजकारणामुळे दहशतवादाला खतपाणी मिळाले. साम्यवादाविरोधी रणनीती म्हणून अमेरिका व अन्य देशांनी काही बंडखोर संघटनांना आर्थिक व लष्करी मदत करून त्यांना सत्ताबदलासाठी वापरले. त्यातून दहशतवादाला अधिक बळकटी मिळाली.

१९८० च्या दशकात धार्मिक मूलतत्त्ववादी चळवळींमधून अनेक दहशतवादी संघटना उदयाला आल्या. धार्मिक कायदे लागू करणे, पाश्चिमात्य संस्कृतीला विरोध करणे आणि स्वतंत्र राष्ट्रनिर्मिती यांसारखी उद्दिष्टे या संघटनांनी मांडली. या संघटनांचे कार्यक्षेत्र आता एका राष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. त्यातून आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना तयार झाल्या आहेत. अल कायदा सारख्या दहशतवादी संघटनांचे जाळे अनेक देशांमध्ये पसरले आहे आणि त्यामुळे जागतिक स्थैर्य धोक्यात आले आहे. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या हल्ल्यामागे अल कायदाचा हात होता. अमेरिकेने कधी काळी दहशतवादाला पोसले होते, आणि तोच दहशतवाद त्यांच्यावर उलटला होता. त्या हल्ल्यात सुमारे ५,००० निरपराध नागरिकांचा मृत्यू झाला. त्यानंतर इंग्लंड, स्पेन आणि भारतातही अशा प्रकारचे हल्ले झाले.

पहिल्या महायुद्धाच्या काळात ९०% मृत्यू सैनिकांचे होते, तर आता घडणाऱ्या सशस्त्र संघर्षांमध्ये ८०% बळी सामान्य नागरिकांचे असतात. यादवी युद्धे, वांशिक संघर्ष आणि दहशतवादी हल्ले यामध्ये सर्वसामान्य जनतेचा मोठा बळी जात आहे.

विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे दहशतवादी संघटनांच्या कार्यपद्धतींमध्ये मोठा बदल झाला आहे. आता आर्थिक व व्यापारी केंद्रांवर आणि संरक्षण दृष्ट्या महत्त्वाच्या केंद्रांवर हल्ले करणे , विमान अपहरण, बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले करणे, अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तींची हत्या करणे, सार्वजनिक ठिकाणी गोळीबार करणे अशा विविध मार्गांनी ते आपली उद्दिष्टे साध्य करत आहेत. हे सर्व प्रकार राष्ट्रा - राष्ट्रांमध्ये युद्धाची परिस्थिती निर्माण करत आहेत.

पहेलगाममधील हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना आदरांजली अर्पण करताना, देशातील एकता आणि अखंडता अबाधित राहील याची जबाबदारी प्रत्येक नागरिकाने घेतली पाहिजे. दहशतवादाला कोणतीही जात किंवा धर्म नसतो, हे जगभरातील विविध घटनांवरून स्पष्ट झाले आहे . अशा हिंसक कृत्यांचा जाहीर निषेध करत, आपण सर्व भारतीयांनी एकजुटीने दहशतवादाविरुद्ध लढण्याचा निर्धार केला पाहिजे!

**- किशोर जाधव सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

# धाराशिव सामान्य रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या निधीचा प्रश्न मार्गी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि २३ धाराशिव :** धाराशिव येथे वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयासोबतच ५०० खाटांचे नवीन जिल्हा रुग्णालय मंजूर केले होते.परंतु त्यासाठी निधी उपलब्ध नसल्याने त्याचे काम रखडले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली असता त्यांनी आशियाई विकास बँकेच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षण विभागासाठी मंजूर निधीमधून खास बाब म्हणून धाराशिवच्या रुग्णालयाला २७६.२५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याने जिल्ह्यातील जनतेला आता जवळपास १००० खाटांची सोय होणार असल्याची माहिती मित्र चे उपाध्यक्ष आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



आशियाई विकास बँकेचा निधी हा वैद्यकीय शिक्षण विभागाला राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या रुग्णालयात सुविधा निर्माण करण्यासाठी उपलब्ध करण्यात आला आहे. याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणविस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. त्याबैठकीत मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या विनंतीला मान देत याला अपवाद करत खास बाब म्हणून धाराशिव जिल्ह्यातील सामान्य रुग्णालयाला २७६.२५ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला असल्याचे आमदार पाटील यांनी म्हटले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी महायुती सरकारने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत व रुग्णालयासाठी नुकताच ४०४ कोटी रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. लवकरच निविदा प्रक्रिया देखील केली जाणार आहे. त्यामुळे येत्या दोन वर्षात सर्व सोयीने युक्त सुसज्ज असे ४३० खाटांचे रुग्णालय नागरिकांच्या सेवेत उपलब्ध होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी निधी उपलब्ध करून दिल्याने आता वैद्यकीय महाविद्यालयाचे रुग्णालयाच्या ४३० खाटा, जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या ५०० खाटा व स्त्री रुग्णालयाच्या ६० मिळून जवळपास १००० खाटा उपलब्ध होणार आहे. याचा फायदा सामान्य नागरिकांसह वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील होणार आहे. याचा आधार घेत भविष्यात वैद्यकीय शाखेच्या पदव्युत्तर शिक्षणाचे कोर्सेस सुरू करण्याचा मानस आमदार पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## अवर्षण..

मुक्त उन्माद मातवे
मनुनिर्मित अवर्षण
मृगजळी आश्वासने
लोभस रे आकर्षण

जल व्यवस्थापनांत
कायमकसले घर्षण
आंदोलनं आधीउभे
सुरु करता सर्वेक्षण

शुष्क राने कवटाळे
नको माती परिक्षण
मना मध्ये किंतू हेतू
चाले आमचे भक्षण

रखवालदार स्वयम्
बोले करा हो रक्षण
सिमापार विचार ना
भोवती घाले कुंपण

नको धो धो पाऊस
आम्हा पुरेसे शिंपण
चेहरा मलीन झाला
स्वच्छ करतो दर्पण

रोगापेक्षा भयावह रे
का वाटते ते लक्षण
प्रगतिला खीळघाले
स्वभावा अव लक्षण

जाहीर होई योजना
विरोध करतो तक्षण
संकटा देई आवतण
स्वताचं करी औक्षण

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# आपण हिन्दू आहोत...!

आजवर अश्या अगणित घटना घडल्या. घटनेनंतर आपण फक्त शोक करण्यापलिकडे काहीच केले नाही.. काही शिकलो नाही.आणि काहीच समजून घेतले नाही. जसे नव्याचे नऊ दिवस तसे दुःखाचे दहा दिवस, या धर्तीवर परत आम्ही मरायला तयार..! गेली हजार वर्ष हिंदु मरत आहे. अवघ्या पंच्च्याहत्तर वर्षोपुर्वी आपण आपल्या देशाच्या फाळणी स्वरूपात एक मोठी किंमत चुकविली आहे. तेव्हाही दहा लाखाच्या वर हिंदु मारला गेला. स्वातंत्र्यानंतर काश्मिर मध्येही हिंदु मारला गेला. शेजारच्या ईस्लामी राष्ट्रात ही हिंदु मारला गेला.आजही मारला जातोय. पण यातुन आपण काय शिकलो. काहीही नाही.. आपण फक्त शोक करत राहिलो.. निदर्शने, काळ्या फिती, आक्रोश... आणि उद्या लगेच गळाभेटीला तयार, कारण आमच्यातील भाईचाऱ्याचा पुळका जाणारच नाही.

हिंदुना मारणे हाच त्यांचा धर्म आहे.पण हिंदु का मेला?आताच पहलगाममधील पर्यटक हिंदुचे काय झाले? याचा संशोधन केल्यास एकच सिद्ध होते की, हिंदुद्वेष...! नितिभ्रष्ट, नपुसक आतंक्यानी नग्न करून त्यांना, तपासुन गोळ्या घातल्या. मुलं, पत्नी, लेकर बाळांसमोर शरीराच्या चिंधड्या-चिंधड्या केल्या.त्या मेलेल्या हिंदुतील किती लोकांनी परधर्माचा द्वेष केला असेल? मुळीच नाही. याउलट, कितीतरी लोकांनी सर्वधर्मसमभाव, हिंदु - मुस्लीम भाई -भाई चे नारे दिले असतील.गळ्यात गळे घातले असतील. दहशतवादाला धर्म नसतो..! हे म्हणत राहिले असतील. सर्वधर्मसमभाव जोपासून त्यांनी ईदला शुभेच्छा दिल्या असतील.पण एक क्षण....!, फक्त एक क्षण...! त्या क्षणी आयुष्यात अशी कल्पनाही नाही केली नसेल की, कुणीतरी भाईचाऱ्यातील भाईयेईल अन कपाळावर बंदूक ठेवुन विचारेल की? तुझा धर्म कोणता? या भयान मृत्युच्या दारात उभे असलेल्यांनी काय उत्तर द्यावं? प्रश्न फक्त एकाच क्षणाचा होता. त्याच्या जिवाने काय म्हटले असेल? काय आठवले असेल. भाईचारा, गळाभेटी, ईदच्या शुभेच्छा की, याचा जीव घेऊ? जीव घेणं तर शक्यचं नव्हतं कारण, ते निशश्त्र होते. त्या हिजड्या, नपुंसक आतक्यांनी तो भ्याड हल्ला केला होता. निशश्त्र निष्पाप, हतबल अश्या हिन्दूने शब्द उच्चारला, हिन्दू...!त्या एका क्षणात धाड-धाड गोळ्या झाडल्या. एकच आक्रोश ! माझ्या पतीला वाचवा, माझ्या भावाला वाचवा, माझ्या बाबाला वाचवा. मारू नका! मारू नका. चहुंकडे आक्रोशच आक्रोश...! रक्ताच्या थारोळ्यात हिन्दू मारला.केवळ तो हिंदु होता म्हणून...! पण आपण यातुनही काही शिकणार नाही आहोत.. कारण आपण हिंदु आहोत..!

आजपर्यंत आपल्याला आपण हिंदु आहोतम्हणूनच मारले जातोय,हे समजून घ्यायलाच आपण तयार नाही आहोत.आपण हे मान्यच करत नाही आहोत. म्हणतात, दहशतवादाला धर्म नसतो बरोबर ! पण एकच धर्म आहे. आणि त्या धर्मातच दहशतवाद आहे.दहशतवादाला धर्म नसतो पण, ती दहशत निर्माण करणाऱ्याला मात्र नक्कीच धर्म असतो.विषय हाच आहे. जोवर आपण फक्त न शिकता,न समजून घेता. फक्त शोक,माया, ममता, दया, क्षमा करत राहू,तोपर्यंत आपण मरतच राहू. हेच आपलं प्राक्तन आहे.. आपण स्वतः स्विकारलेलं....! पण हे किती दिवस चालायचं?..! किती दिवस सहन करायच?आता पुरे झालं...!

इतिहास साक्षी आहे, छत्रपती संभाजी महाराजांची हत्या फक्त एक राजा आहे म्हणून केली नव्हती, तर एकहिंदु राजा म्हणून केली होती. त्याकाळात नपुंसक औरंगने कुतूबशाही, अदिलशाहीच्या सुलतानांना का तसे मारले नाही?त्यांना कैदी म्हणून सर्व सुखसोई, मानसन्मानाने का वागविले? आणि शंभुराजांची विटंबना करून त्यांनाच का मारले? असा प्रश्न आपल्याला पडत नाही.कारण आपण हिंदु आहोत.

**मित्रहो...!**

आज लिखाणात बरीच कठोरता जाणवेल.कारण अश्या कितीतरी निर्दयी घटनांनी हृदय पिळवटून काढले.निष्पाप हिंदूवरील आत्याचर,आक्रोशाने मन अस्वस्थ केले, त्यातून जिव बैचेन झाला.कासावीस झाला. लक्षात ठेवा. आपल्याकडे त्यांच्यासाठी कितीही ममत्व, प्रेम, समभाव, भाईचारा असला तरी, त्यांच्याकडे आपल्याला मारायला फक्त एकच कारण पुरेसे आहे.. ते म्हणजे केवळ आपण हिंदुआहोत...!

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## बुलडाणा येथे उन्हाळी क्रीडा व संस्कार शिबिर आयोजित



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, बुलडाणा :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित श्री शिवाजी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय एच.एस.व्ही.सी बुलडाणा येथे उन्हाळी क्रीडा व संस्कार शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच त्यांच्या अंगी असणारे विविध कलागुणांना वाव देण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. या शिबिरामध्ये विविध प्रकारचे क्रीडा नृत्य गीत गायन वकृत्व चित्रकला ध्यान व योगासन त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे आवडते छंद याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजक प्राचार्य श्री कावरे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शारीरिक शिक्षक श्री पाटील व सर्व शिक्षक, शिक्षकेतर, कर्मचारी यांनी या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गुरुवार, दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी शाळेचे प्राचार्य श्री कावरे, प्रभारी पर्यवेक्षक श्री राजपूत, जूनियर कॉलेज प्रमुख भोंडे, श्री वाघ, शारीरिक शिक्षक श्री.पाटील तथा इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीमध्ये या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

## महसूल अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून वाळू तस्करी जोमात

### लोणार तालुक्यातील महसूल विभाग कोमात



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील महसूल अधिकारी व कर्मचार्यांच्या नाकावर टिच्चून रेती तस्करी बिनबोभाट सुरु आहे. रेती चोरीमुळे शासनाचा महसुल बुडत आहे. शासनाकडुन जनतेला कमी दरात रेती देण्याची घोषणा हवेत विरत चालली आहे. त्यामुळे लोणार तालुक्यात वाळू तस्करीने कळस गाठला असल्याचे निदर्शनात येत आहे. या प्रकारात अनेक दिवसापासुन बेसुमार वाढ झाली असून रात्री बेरात्री बिनबोभाटपणे अवैध रेतीची तस्करी केल्या जात आहे. गावामध्ये दलालामार्फत अव्वाच्या सव्वा दराने वाळू विक्री करुन रेती माफीया गब्बर झाले आहेत. येथील महसुल विभाग मुंग गिळुन चुपचाप आहे. याबाबत वरिष्ठ अधिकार्यांनी लक्ष दिले तरच या प्रकारावर आळा बसून शासनाचा महसूलचाटक्का वाढेल. एकाही महसुल कमचार्यांच्या हाती अवैध रेती वाहतुकीची वाहने नजरेस पडत नाही. अवैध वाहतुक करणार्या वाळु वाहनांचा वाहतुकीचा वेग हा भयंकर असल्याने अनेकदा सर्वसामान्यांना रहदारीला मोठा अडथळा निर्माण होतो. विशेष म्हणजे, वाळू वाहतूक करणार्या वाहनाचे नंबर प्लेट बदलल्या जातात किंवा अंधूक केल्या जातात. वाळू तस्करी व ओव्हरलोड वाहतुकीमुळे परिसरातील चांगल्या रस्त्यांची पुरती वाट लागली आहे. वाळू तस्करी जोमात असताना महसूल विभाग यंत्रणा कोमात गेल्याने तस्करांना आळा घालणारा तरी कोण? असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे.

अवैध वाळूच्या ओव्हरलोड वाहनामुळे तालुयातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. महसुल विभागाचे अधिकारी तहसीलदार,उपविभागीय अधिकारी फक्त आणि फक्त पगारापुरतेच काम करतात. अधिकार्यांच्या नाकर्तेपणामुळे वाळु तस्कराचे चांगलेच फोफावले आहे. जिल्हाधिकारी सुद्धा तालुकास्तरावरील अधिकार्यांच्या दैनदिन कामकाजावर डोळेझाक करतात. त्यामुळे शासनाचा महसुल बुडत आहे. वाळु विक्रेत्यांनी रेतीचे दर गगनाला भिडवल्याने घराचे बांधकाम करणे जिकरीचे झाले आहे. वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का? हा प्रश्न निर्माण होत आहे.

## पहलगाम येथील अतिरेकी भ्याड हल्लयाच्या निषेधार्थ पेठ शिवणी बाजारपेठ कडकडीत बंद



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील पेठ शिवणी येथील व्यापाऱ्यांनी जम्मू-काश्मीर राज्यातील पर्यटनस्थळ पहलगाम या ठिकाणी हिंदू बांधवावर अतिरेक्यांनी बेछूट गोळ्या झाडून २६ लोकांचा जीव घेऊन काही जणांना गंभीर जखमी केले. या घटनेची माहिती देशभरात समाज माध्यमावरून लोकांना समजली. त्यात पेठ शिवणी येथील व्यापाऱ्यांनी गुरुवार, दि.२४ एप्रिल २०२५ रोजी या घटनेच्या निषेधार्थ स्वयंस्फूर्तीने आपली दुकाने बंद ठेवली. दरम्यान सकाळी ११ वाजता सर्व व्यापारी बांधव एकत्र येऊन अतिरेकी भ्याड हल्लयात मृत्यू मुखी पडलेल्या हिंदू बांधवांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर घडलेल्या घटनेचा जाहीर निषेध नोंदवला. पेठशिवणी बाजारपेठ बंद असल्याची माहिती समजताच पालम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेश थोरात, पोलीस बिट जमादार कोलमवाड यांनी पेठशिवनी येथे व्यापारी बांधवांची चर्चा केली. बंद शांततेत पाळण्यात आला.

## डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळा अनावरण सदर्भात बैठक संपन्न

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.२४, धाराशिव :** संयुक्त महाराष्ट्राचे खरे शिल्पकार सत्यशोधक साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धकृती पुतळ्याचा अनावरण समारंभ दिनांक ०१ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता मौजे होळी ता.लोहारा जि.धाराशिव येथे आयोजित केला आहे. या कार्यक्रमासंदर्भात नुकतीच दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी दुपारी ११ वाजता शासकीय विश्रामगृह उमरगा येथे उमरगा व लोहारा तालुका सकल मातंग समाज व लहुजी शक्ती सेना पदाधिकारी यांची बैठक संपन्न झाली.

त्यावेळी प्रमुख उपस्थिती प्रदेश सचिव दिलीप बापू गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर बनसोडे, उमरगा तालुका अध्यक्ष विजय तोरडकर, महिला जिल्हा संघटक भाग्यशी सूर्यवंशी, महिला तालुका अध्यक्ष अलका कांबळे, (शिंदे गट) समन्वयक छाया पात्रे, ॲड.सुखदेव होळकर, नितीन भाऊ शिंदे, संजय सरवदे, तानाजी शिंदे, अर्जुन थोरात, बालाजी कांबळे, संभाजी गायकवाड, मारुती क्षिरसागर, किशोर क्षीरसागर इत्यादी समाज बांधव पदाधिकारी यांच्या उपस्थित बैठक संपन्न झाली.

# गावातच मोफत केवायसी करा; कष्टकरी संघाची तहसीलदारांकडे मागणी

## अन्यथा आंदोलनाचा इशारा



शेतकरी, कष्टकऱ्यांची KYC (आधार प्रमाणीकरण) साठी होणारी परवड कष्टकरी संघाने निवेदनातून मांडली असून त्यांची मागणी रास्त आहे. या संदर्भाने सोमवार, दिनांक २८ एप्रिल २०२५ रोजी या संदर्भात काम करणाऱ्यांची मिटींग बोलवली असून KYC बाबत लेखी कळविण्यात येईल.

**– भुषण पाटील, तहसीलदार लोणार**

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, लोणार (बुलडाणा) :** शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी गरजेचे असलेले आधार प्रमाणिकरण (KYC) प्रक्रियेमुळे ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ही समस्या लक्षात घेता, कष्टकरी संघाचे अध्यक्ष सागर पनाड यांनी तहसीलदारांना निवेदन देत गावागावातच मोफत केवायसी करण्यासाठी महसूल कर्मचाऱ्यांमार्फत मोहीम राबवण्याची मागणी केली आहे. सध्या पीएम किसान, संजय गांधी निराधार, भारत गॅस, बँक केवायसी अशा अनेक योजनांसाठी लाभार्थ्यांना शहरात जाऊन केवायसी करावी लागते.

या प्रक्रियेत कोणतेही अधिकृत शुल्क नसताना, २०० ते २५० रुपये वसूल करण्यात येत आहेत, असा आरोप कष्टकरी संघाने केला आहे. यामुळे आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास वाढत आहे.

कष्टकरी संघाने निवेदनात म्हटले आहे की, महसूल विभागातील कर्मचारी गावागावात जाऊन मोफत केवायसी करतील असा लेखी आदेश ७ दिवसांच्या आत निर्गमित करावा. अन्यथा, कष्टकरी शेतकरी व शेतमजुरांना घेऊन मोठ्या प्रमाणावर तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ही देण्यात आला आहे. निवेदनावर अध्यक्ष सागर पनाड यांच्या सह भाऊराव भालेराव, गजानन भानापुरे, महीपंत वाणी यांच्या स्वाक्षऱ्या असुन कष्टकरी जनतेच्या न्याय मागणीसाठी होणाऱ्या या आंदोलनामुळे कुठल्याही पेचप्रसंगास निर्माण झाल्यास तहसीलदार जबाबदार राहतील, असे निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. संघाने शेतकऱ्यांच्या व कष्टकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लढा उभारण्याची तयारी दर्शवली असून, प्रशासनाने लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी होत आहे.

# खासदार म्हस्के यांनी कामात हलगर्जी करणाऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांना घेतले फैलावर



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२४, भाईंदर (ठाणे) :** रेल्वे प्रवाशांचा प्रवास सुखकर करण्याऐवजी कामात हलगर्जीपणा करत प्रवाशांच्या प्रवासात अडचणी निर्माण करणाऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांना ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी आज चांगलेच फैलावर घेतले. अचानक ट्रेन रद्द करणे, नियमित धावणारी ट्रेन बंद करून वातानुकूलित रेल्वे सुरू करणे, अस्वच्छ स्वच्छतागृहे -विश्रामगृहे तसेच खासदारांना विश्वासात न घेता विकास कामे सुरु करणे यावरुन अधिकाऱ्यांची खासदार नरेश म्हस्के यांनी खरडपट्टी काढली. यापुढे मतदारसंघातील खासदारांना विकास कामांची माहिती देण्यासाठी एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल, असे आश्वासन रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी खासदार नरेश म्हस्के यांना दिले.

गुरुवार, दि.२४ एप्रिल २०२५ रोजी पश्चिम रेल्वे अंतर्गत येणाऱ्या स्थानकांतील खासदारांची एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये खासदार नरेश म्हस्के, खासदार रविंद्र वायकर, खासदार वर्षा गायकवाड, खासदार अनिल देसाई, खासदार स्मिता वाघ, खासदार उमेशभाई पटेल, खासदार शोभा बच्छाव, रेल्वेचे जीएम अशोक कुमार मिश्रा, डीआरएम पंकज सिंग व रेल्वे आणि मुंबई महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी सहभागी झाले होते.

बैठकीमध्ये ठाणे लोकसभा मतदारसंघ अंतर्गत येणाऱ्या भाईंदर आणि मिरारोड या रेल्वे स्थानकांसंदर्भातील अडचणी खासदार नरेश म्हस्के यांनी मांडत विविध सूचना केल्या. भाईंदर पश्चिमेतील उत्तरेकडील एक्सीलेटरचे काम पूर्ण झाले आहे, ज्याच्या उद्घाटनामुळे प्रवाशांना सुविधा मिळणार आहे. प्रवाशांची संख्या आणि भविष्यातील गरजा लक्षात घेता प्लॅटफॉर्म ३/४ वर एस्कीलेटर ची स्थापना, प्लॅटफॉर्म ५ वर लिफ्ट आणि एस्कीलेटर बसवणे, प्लॅटफॉर्म ४ आणि ५ दरम्यान अतिरिक्त प्लॅटफॉर्म (४-लाइन बॉक्स) तयार करणे. भाईंदर पश्चिमेकडील गोराईपर्यंत दररोज सुमारे ७ लाख प्रवासी येतात. पूर्वेकडील कॉलेज आणि रामदेव पार्क पर्यंतचे प्रवासी देखील भाईंदर रेल्वे स्थानकाचा वापर करतात. प्रवाशांची ही मोठी संख्या पाहता, भाईंदर येथून अधिक लोकल गाड्या चालवणे आवश्यक आहे. भाईंदर हे एक महत्त्वाचे औद्योगिक शहर आहे जिथे रोजगार आणि व्यवसायासाठी दररोज बाहेरील भागातून लाखो प्रवासी येतात. या वाढत्या प्रवाशांना सुरळीत वाहतूक प्रदान करण्यासाठी रेल्वे स्थानकावरील प्रवासी सुविधांचा विस्तार महत्त्वाची भूमिका बजावेल असे खासदार नरेश म्हस्के म्हणाले.

बोरिवली ते डहाणू रोड पर्यंत तिसरी आणि चौथी लाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे. भाईंदर पश्चिमेकडील प्लॅटफॉर्म बांधण्यासाठी चिन्हांकित केलेली रेल्वे जमीन वर्षानुवर्षे एका बिल्डरशी करारबद्ध करण्यात आली आहे. यामुळे ती जमीन सध्या रेल्वेला परत करण्यात आलेली नाही. रेल्वे नियमांनुसार प्लॅटफॉर्मवर लिफ्ट आणि एस्कीलेटर बसवण्यासाठी किमान १० मीटर रुंदी आवश्यक आहे, तर सध्या त्या ठिकाणी ६ मीटर जागा उपलब्ध आहे.

ज्यामुळे लिफ्ट आणि एस्कीलेटर बसवणे कठीण होत आहे. या संदर्भात माझ्याकडे काही कागदपत्रे उपलब्ध आहेत. जी मी तुम्हाला सादर करू शकतो. शासनाने बिल्डरविरुद्ध तक्रार दाखल केल्याची माहिती आहे. विकासकामात अडथळा येऊ नये म्हणून जमिनीशी संबंधित ही समस्या प्राधान्याने सोडवावी, अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत केली. मीरा रोड पश्चिम येथे एक नवीन प्लॅटफॉर्म बांधला जाणार आहे. या प्लॅटफॉर्मची रुंदी किमान १० मीटर ठेवावी जेणेकरून भाईंदर स्थानकासारखी गर्दीची परिस्थिती टाळता येईल. भूखंडाच्या उपलब्धतेनुसार त्याचे योग्य नियोजन करावे. प्रवाशांच्या सोयीसाठी स्टेशनवर बांधलेला हॉल सध्या भिकाऱ्यांचा अड्डा बनला आहे. फेरीवाल्यांचा ही प्रवाशांना त्रास होत आहे. या समस्या लवकरात लवकर सोडविण्याची सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली. प्रवाशांची संख्या लक्षात घेता लांब रांगेत उभे राहावे लागू नये म्हणून तिकीट खिडक्यांची संख्या पुरेशी वाढवावी. रेल्वेने सकाळी आणि संध्याकाळी गर्दीच्या वेळी साखळी पद्धतीने लोकल गाड्या चालवाव्यात.

विरार ते वसई, बोरिवली, अंधेरी, वांद्रे, दादर, मुंबई सेंट्रल अशा ठिकाणी लोकल गाड्या धावतात. त्याचप्रमाणे वसई ते भाईंदर, मीरा रोड, अंधेरी अशा ठिकाणी लोकल गाड्या सुरू कराव्यात. यामुळे मीरा रोड आणि भाईंदर च्या प्रवाशांना मुंबईच्या विविध ठिकाणी जाणे सोयीस्कर होईल असे खासदार नरेश म्हस्के म्हणाले. भाईंदर आणि मिरारोड स्टेशन वरील समस्यांचे निवेदन खासदार नरेश म्हस्के यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना दिले. यावेळी निवेदन देताना शिवसेना जिल्हाप्रमुख राजू भोईर, मीरा भाईंदर विधानसभा प्रमुख विक्रम प्रतापसिंह उपस्थित होते.

# जागतिक हिवताप दिन

जागतिक हिवताप दिन दरवर्षी दिनांक २५ एप्रिल २०२५ रोजी साजरा केला जातो. यामागचा उद्देश म्हणजे हिवतापविषयी जनतेमध्ये जनजागृती निर्माण करणे, प्रतिबंधात्मक उपायांची अंमलबजावणी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे.या वर्षीचा जागतिक हिवताप दिन Malaria Ends With Us: Reinvest, Reimagine, Reignite या घोषवाक्याखाली साजरा करण्यात येत असून त्याचे मराठी रूपांतर आहे – चला हिवतापाला संपवू या,पुन्हा योगदान द्या,पुनर्विचार करा आणि पुन्हा सक्रिय व्हा.

हिवताप हा प्लाझमोडियम नावाच्या परजीवीमुळे होणारा आजार आहे, जो मादी ॲनॉफिलीस डासांच्या चाव्यामुळे पसरतो. हा डास स्वच्छ पाण्याच्या साठ्यांमध्ये वाढतो, जसे की नदी, विहीर, टाक्या इत्यादी. हिवतापाची लक्षणे सामान्यतः डास चावल्यानंतर १० ते १५ दिवसांनी दिसू लागतात. यात थंडी वाजून ताप येणे, घाम येणे, डोकेदुखी, अशक्तपणा, मळमळ, उलटी व काही वेळा बेशुद्धी यांचा समावेश होतो. हिवतापाच्या निदानासाठी जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये

मोफत तपासणी सुविधा उपलब्ध असून, तपासणी




दोन पद्धतींनी केली जाते – सूक्ष्मदर्शकाद्वारे व आरडीके चाचणीने.

जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि सेविका यांच्यामार्फत दररोज सर्वेक्षण करून ताप रुग्णांचे रक्तनमुने घेतले जातात.तपासणीत हिवताप आढळल्यास वयोगट व जंतूच्या प्रकारानुसार तात्काळ उपचार दिले जातात.

**हिवतापाचे दोन प्रकार –** प्लाझमोडियम व्हायव्हॅक्स व प्लाझमोडियम फॅल्सिपॅरम – आढळून येतात.व्हायव्हॅक्स रुग्णास १४ दिवस आणि फॅल्सिपॅरम रुग्णास ३ दिवस औषधोपचार दिले जातात.

**नागरिकांनी घ्यावयाची काळजी : –**

ताप आल्यास तात्काळ जवळच्या आरोग्य संस्थेत जाऊन रक्त तपासणी करून डॉक्टरांच्या सल्लयाने उपचार घ्यावा. घराभोवती पाणी साचू देऊ नये, डबकी असल्यास वाहती करावी. मच्छरदाणी, कीटकनाशक, रासायनिक कॉइल्स यांचा वापर करावा.संपूर्ण बाह्यांचे कपडे घालावेत व डास प्रतिबंधक क्रीम वापरावे. प्रवास करताना आवश्यक ती प्रतिबंधात्मक औषधे डॉक्टरांच्या सल्लयाने घ्यावे.

आरोग्य विभागामार्फत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की,हिवताप टाळण्यासाठी व आपल्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी वरिल उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करावे. योग्य वेळी निदान आणि उपचार केल्यास हिवतापावर मात करणे शक्य आहे.

**- विकास वाघ (धाराशिव)**

# चिचोली (खापरखेडा) नगरपरिषदेचा दुरूस्त प्रस्ताव जि.प.कडे सादर

## पंचायत समिती व तहसील कार्यालयाने केल्या त्रुट्या पूर्ण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** चिचोली (खापरखेडा), भानेगाव व चनकापूर ग्राम पंचायतीना एकत्र करून नगरपरिषदेच्या प्रस्तावात सावनेर पंचायत समिती व तहसील कार्यालयाने दुर्लक्ष केल्यामूळे असंख्य त्रूट्या आढळून आल्या होत्या. यासंदर्भात नागपूर जि.प.ने सावनेर पंचायत समिती व तहसील कार्यालयाला त्रुटी दुरुस्त करण्याचे आदेश दिले. अखेर यासंदर्भात दिनांक २४ एप्रिल रोजी वर्तमानपत्रात आलेल्या बातम्यांची आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी स्वतः जातीने दखल घेवून संबंधित अधिकाऱ्यांची कान उघडणी केल्यानंतर सावनेर पंचायत समिती व तहसील कार्यालयाने त्रूट्या पूर्ण करून गुरुवार, दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी चिचोली (खापरखेडा), भानेगाव व चनकापूर नगरपरिषदेचा प्रस्ताव नागपूर जि.प.कडे सादर केल्याची माहिती प्राप्त झाली आहे. चिचोली(खापरखेडा), भानेगाव व चनकापूर ग्रामपंचायतचे नगरपरिषद मध्ये रूपांतर करण्यासाठी तिन्ही ग्रामपंचायत प्रशासनाने बहुमताने ठराव मंजूर केलेत, ठरावाची अंमलबजावणी करण्यात आली. मात्र, शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार शहानिशा न करता नागपूर जि.प.कडे नगरपरिषदेचा प्रस्ताव सादर करण्यात आला. यासंदर्भात सावनेर पंचायत समिती व तहसील कार्यालयाकडे वेळोवेळी पत्रव्यवहाराद्वारे सूचना करूनही दुर्लक्ष करण्यात आले. वृत्तपत्रात बातम्या प्रसिद्ध होताच आमदार डॉ.आशिष देशमुख यांनी स्वतः जातीने दाखल घेऊन आपल्या हाती सूत्रे घेवून गटविकास अधिकारी व तहसीलदार यांना आदेश दिले. या अनुषंगाने दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी तहसील कार्यालयात तडकाफडकी बैठक बोलविण्यात आली. याप्रसंगी तहसीलदार रवींद्र होळी, गटविकास अधिकारी मनोज हिरुळकर, विस्तार अधिकारी, तलाठी आदी उपस्थित होते. यावेळी नागपूर जि.प.ने पत्रात नमूद केलेल्या तृट्या पूर्ण करून तात्काळ नागपूर जि.प.कडे चिचोली(खापरखेडा), भानेगाव, चनकापूर नगरपरिषदेचा प्रस्ताव पाठविण्यात आला.




त्रुट्या पूर्ण करुन चिंचोली (खापरखेडा), भानेगाव व चनकापूर नगरपरिषदेचा प्रस्ताव नागपूर जिल्हा परिषदेला तात्काळ पाठविण्यात आल्याच्या बातमीला गटविकास अधिकारी मनोज हिरुळकर यांनी दुजोरा दिला आहे.

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांकडून दहशतवादी हल्ल्याचा निषेध

### भ्याड हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली अर्पण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** जम्मू - काश्मीर मधील पहलगाम येथे झालेला अतिरेक्यांच्या भ्याड हल्ला हा अत्यंत निंदनीय आणि वेदनादायी आहे. या भ्याड हल्ल्यात अनेक निष्पाप पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला. दुर्दैवी मृत पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. आणि हाल्लेखोरांचा निषेध टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने व्यक्त करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर गावाच्या वेशी समोर बुधवार,दि.२३ एप्रिल २०२५ रोजी गावातील सामाजिक, राजकीय,माध्यम प्रतिनिधी व नागरीक यांच्या वतीने जम्मू काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या पर्यटकांवर भ्याड दहशतवादी हल्ला झाला. या अमानवी कृत्यात जवळपास २७ पेक्षा जास्त निष्पाप पर्यटक नागरिकांनी आपला जीव गमावला. हा दहशतवादी हल्ला अतिशय निंदनीय तसेच हृदय पिळवटून टाकणारा आहे. या हल्ल्यात दुर्दैवाने मृत्युमुखी पडलेल्यांना भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. व सदरील भ्याड हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांचा निषेध करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने हल्ल्यातील जखमींची प्रकृती लवकरात लवकर स्थिर व्हावी अशी प्रार्थना करण्यात आली. आणि मानवतेवर हा क्रूर हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी माजी सरपंच तसेच भाजपचे मंडळाअध्यक्ष शिवाजी खिलारी, बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, पंचायत समिती सदस्य अमोल साळवे, संकेत झावरे, लक्ष्मण झावरे, कुसकर, राजू आल्हाट, बाळासाहेब खिलारी, अतुल सैद यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ढोकी येथिल गावठाण वस्ती येथे सिंगल फेज देण्याची मागणी

## महावितरणच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढोकी येथिल गावठाण लागत असलेल्या हद्दीतील पवार वस्ती,इनाम वस्ती,तोरे वस्ती या तिन्ही वस्त्यांसाठी स्वतंत्र सिंगल फेज ट्रान्सफॉर्मर बसवून मिळावे. याबाबत ढोकी ग्रामपंचायतीने महावितरणचे मुख्य कार्यकारी अभियंता यांना (दि.०३, जानेवारी २०२५) महिन्यात निवेदन दिले होते. परंतु त्याची अंमलबजावणी केली जात नसल्याने गावठाण लागत ३५ ते ४० शेतकऱ्यांची लोक वस्ती आहे. त्यांना सिंगल फेज करून मिळावे. अशी मागणी वस्तीतील शेतकऱ्यांनी केली आहे.

ढोकी येथिल पवार, इनाम, तोरे या वस्तीसाठी सिंगल फेज नसल्यामुळे येथे राहणाऱ्या लोकांना वीज पुरवठा सुरळीत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुलांचे वार्षिक परीक्षा सुरू असून विद्युत पुरवठा अभावी त्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे. संध्याकाळी वस्तीवर वीज नसल्यामुळे सरपटणाऱ्या विषारी प्राण्यांपासून धोका वाढला आहे. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे मोठ्या प्रमाणात उकाडा जाणवत आहे. जनावरांना चारा पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. वस्तीवरील जनावरांना व माणसांना पिण्याच्या पाण्यासाठी परिसरातील तळ्यांचा आसरा घ्यावा लागत आहे. त्यामुळे महावितरण विभागाने वस्तीवरील नागरिकांची गैरसोय दूर करून सिंगल फेज करून घ्यावी. अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.



**हायव्होल्टेज आंदोलनाचा इशारा**

टाकळी ढोकेश्वर परिसरातील ढोकी, वडगाव सावताळ, वासुंदे,खडकवाडी, कर्जुलेहर्या या गावांमध्ये सुद्धा ठिक ठिकाणी सिंगल फेज योजनेचे फक्त सिंगल फेजचे सांगाडे (पोल) उभे करून ठेवलेले आहेत. त्यावर ट्रान्सफॉर्मर देखील बसविण्यात आलेले नाहीत. विजपुरवठा सुरळीत मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीमाल दिवसेंदिवस जळून चालले आहेत, तरीही महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाग येत नसेल तर येणाऱ्या काळात खासदार निलेश लंके यांच्या माध्यमातून सिंगल फेज कामाच्या बाबतीत महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल व टाकळी ढोकेश्वर परिसरातील १० ते १५ गावातील संतप्त ग्रामस्थांसह महावितरणच्या विरोधात हायव्होल्टेज आंदोलन छेडण्याचा इशारा ही देण्यात आला आहे.

**- बाळासाहेब खिलारी, अध्यक्ष (खासदार निलेश लंके प्रतिष्ठान)**

# हदगाव महावितरण तर्फे लकी डिजिटल ग्राहक योजने अंतर्गत बक्षीस वितरण



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.२३, हदगाव (नांदेड) :** महावितरण हदगाव तर्फे १ जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात आली होती. या योजने अंतर्गत ऑनलाईन वीज देयक भरणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉ द्वारे बक्षीस वितरीत करण्यात येणार होते त्या मध्ये प्रथम बक्षीस डर्रीिपस कंपनीचे मोबाईल, द्वितीय बक्षीस चख कंपनीचे व तृतीय बक्षीस त्र्रीिंऑरलज्ञ कंपनीचे वॉच वितरीत करण्यात येणार होते. त्यामध्ये हदगाव ग्रामीण शाखेतील मौजे गोर्लेगाव येथील वीज ग्राहक गोविंद साहेबराव चव्हाण यांना द्वितीय बक्षीस स्वरूपात चख कंपनीचे मोबाईल देण्यात आले. बक्षीस वितरीत करते वेळेस एम.आर जयस्वाल सहाय्यक अभियंता हदगाव ग्रामीण, एस.पी धकाते सहाय्यक अभियंता हदगाव शहर, जी.बी चव्हाण प्रधान तंत्रज्ञ, ए.यू माने वरिष्ठ तंत्रज्ञ हजर होते. तसेच हदगाव मधील सर्व वीज ग्राहकांनी अशाच प्रकारे महावितरण कंपनीचे वीज बिल ऑनलाईन पद्धतीने भरून सहकार्य करावे व अश्या योजनाचा लाभ घेण्याचे आव्हान करण्यात आले.

# लष्करी हद्दीतील समस्यांबाबत खा.लंके यांची बैठक

## लष्करी हद्दीलगत १० मीटरवर बांधकामाचा प्रस्ताव

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२४, अहिल्यानगर :** लष्करी हद्दीलगत १०० ऐवजी १० मीटर मर्यादेत बांधकामास ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याचा प्रस्ताव संरक्षण मंत्रालयाकडे पाठवण्याचे लष्करी अधिकाऱ्यांनी मान्य केल्याची माहिती खासदार नीलेश लंके यांनी दिली. यामुळे अहिल्यानगर तालुक्यातील वाकोडी, दरेवाडी, निंबोडी आदी गावातील रहिवाशांचा घरबाधणीचा प्रश्न मार्गी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लष्कराच्या हद्दीलगतच्या विविध नागरी समस्या तसेच बेलेश्वर (भिंगार) व खोपेश्वर (विळद) मंदिराच्या विकासासंदर्भात खासदार लंके व लष्करी अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. यावेळी लष्कराच्या एसीअँडएसचे कमांडर रिसोल डिसूजा, कमांडर समीर सरदाना, लेफ्टनंट कर्नल मने, लेफ्टनंट कर्नल संजय दीक्षित, भिंगार छावणी मंडळाचे मुख्याधिकारी विक्रांत मोरे तसेच अहमदनगर क्लबचे अध्यक्ष अशोक पितळे, माजी नगरसेवक मुदसर शेख, गणेश तोडमल, सचिन कराळे, प्रवीण वारुळे, गणेश रोडे, ॲड. विनोद गवळी तसेच वाकोडी, दरेवाडी, निंबोडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

भिंगार येथील बेलेश्वर व विळद येथील खोपेश्वर मंदिराचे सुशोभीकरण व वीज पुरवठ्याचा प्रस्तावास लष्करी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून सीमारेषा निश्चित करून अधिकृत परवानगी घेण्यासंदर्भात खासदार निलेश लंके यांनी बैठकीत सांगितले.

अहमदनगर क्लबसमोरील रस्त्याच्या दुरुस्तीसाठी या बैठकीत परवानगी देण्यात आली. या रस्त्यासाठी १५ लाख रुपयांचा निधी देण्याचे खासदार निलेश लंके यांनी मान्य केले. लष्करी हद्दीतील अनेक रस्ते व पूल नागरिकांसाठी पूर्वी खुले होते. मात्र अलिकडच्या काळात हे रस्ते बंद करण्यात आले आहेत.

त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो. हे रस्ते किमान शैक्षणिक व अत्यावश्यक गरजांसाठी तरी खुले करावेत अशी मागणी खासदार लंके यांनी केली. दरेवाडी - हरीमळा रस्ता नागरिकांसाठी खुला करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



**बॉम निकामी करा**

महिन्यापूर्वी राहुरी कृषी विद्यापीठाच्या परिसरात विमानातून जिवंत बॉम पडला. तो जमिनीमध्ये सात फूट खोलीवर अडकला आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी मुळा धरणावरून नेलेल्या जलवाहिन्या फुटल्या आहेत. जिवंत बॉम तिथे पडून राहिल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होणार असल्याने तो तातडीने निकामी करण्याची सूचना खासदार निलेश लंके यांनी लष्कराकडे केली.

# केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी केली उल्हास नदीची पाहणी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, कल्याण :** कल्याण-डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सोमवारी कल्याण परिक्षेत्रातील उल्हास नदी व कल्याण (पश्चिम) येथील नाले साफ-सफाईचा पाहणी दौरा केला. या पाहणी दौऱ्यावेळी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने उल्हास नदीतील जलपर्णी काढण्याचे काम सुरू असून त्यांची पाहणी करून मोहने, गाळेगाव परिसरातील नदीपत्रात येणारे सांडपाणी उपाययोजना काय करता येतील यांचा आढावा घेतला. तसेच उल्हास नदीतील जलपर्णीवर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यावर भर देण्यात येईल, अशी माहिती महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पाहणी दौऱ्या समयी दिली.

**नालेसफाई त्वरीत करणेबाबत संबंधित अधिकाऱ्यांना दिले सक्त निर्देश**

उल्हास नदीमध्ये औद्योगिक कंपन्यांचे केमिकलयुक्त पाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने नाल्यांमधील जलपर्णी वाढल्यामुळे गाळ साचतो व पावसाळ्यात नाले ओव्हरफ्लो होतात. यावर कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून उल्हास नदी पुनरुज्जीवन करणे आवश्यक आहे. यादृष्टीकोनातून महानगरपालिकेने नियोजन सुरु केले असल्याबाबत महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी सांगितले आहे. मोहने व गाळेगाव येथील उल्हास नदीला मिळणाऱ्या नाल्यांची पाहणी करण्यात आली, उल्हास नदी मधील जलपर्णी काढण्याचे काम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मार्फत सुरू आहे. आयुक्तांनी या बाबतीत पुढील उपाययोजना करण्याच्या दृष्टीने डी.पी.आर.करणे बाबत संबंधितांना निर्देशित केले व लवकरात लवकर डि.पी.आर.तयार करून शासनाच्या मंजुरीसाठी सादर करण्यात येईल असे सांगितले.

क.डो.मनपा आयुक्त यांनी 'अ' प्रभागातील लहुजी नगर येथील रस्त्यावरील झोपडपट्टी व चाळीतील सांडपाणी व्यवस्थेची पाहणी केली. कल्याण पश्चिमेतील नाले साफ-सफाई करण्यास सुरुवात झालेली आहे. असल्याने अंबिकानगर येथील नालेसफाईच्या प्रस्तावित कामाबाबत पाहणी केली. त्यानंतर ब प्रभागातील अनुपम नगर येथील नाला व चिकन घर येथील नाल्याची पाहणी केली. घनकचरा व्यवस्थापन योग्य प्रकारे सुरू राहण्याच्या दृष्टीने व नाल्यात कमीत कमी कचरा जाईल असे होण्याच्या दृष्टीने आयुक्त महोदयांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त अतुल पाटील तसेच ब प्रभागाचे सहा.आयुक्त प्रिती गाडे यांना याबाबत डीप क्लिनिंग करणे बाबत निर्देशित केले.

# 'माझे आरोग्य माझ्या हाती' अभियानाच्या अंमलबजावणीसाठी आ.मुनगंटीवार यांच्या विनंतीनंतर मंत्रालयात उच्चस्तरीय बैठक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२३, चंद्रपूर :** महिलांच्या निरोगी आयुष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या माझे आरोग्य माझ्या हाती या अभियानाअंतर्गत चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व महिलांची आरोग्य तपासणी पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप तत्वावर राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयासाठी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी मंत्रालयात सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठक पार पडली. महिलांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि संभाव्य आजारांचे लवकर निदान व्हावे, यासाठी ही मोहीम अत्यंत महत्वाची ठरेल. या मोहिमेच्या जलद अंमलबजावणीसाठी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्राद्वारे विनंती केली होती, त्यानंतर मंत्रालयात बैठक घेण्यात आली.



बैठकीस आमदार सुधीर मुनगंटीवार, आरोग्य विभागाचे आयुक्त, आरोग्य विभागाचे संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अशोक कटारे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.महादेव चिंचोळे, स्त्री व प्रसूती रोग तज्ञ डॉक्टर संघटनेच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.सुनिता तांदूळवाडकर, प्रकल्प संयोजक डॉ.कल्पना गुलवाडे, माजी अध्यक्षा डॉ. कल्पना घाटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रतिनिधी डॉ.मंगेश गुलवाडे आणि प्रा.डॉ.सुरेखा तायडे यांची उपस्थिती होती. या बैठकीत चंद्रपूर जिल्ह्यात वैविध्यपूर्ण आरोग्य सुविधांची आवश्यकता लक्षात घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सूचनांवर मंत्री महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. एफओजीएसआय व चंद्रपूर जिल्हा आरोग्य विभागातर्फे सादरीकरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत चंद्रपूर व कोल्हापूर जिल्ह्यातील स्त्रियांचे वजन, रक्तदाब, रक्तातील साखर (ब्लड शुगर) आणि हिमोग्लोबिन या ४ मूलभूत तपासण्याची मोहिम संपूर्ण स्वास्थ्य जन्म आरोग्य अभियान अंतर्गत राबविण्याचा मानस आहे. महाराष्ट्र शासनाचा आरोग्य विभाग आणि स्त्री व प्रसूती रोग तज्ञ डॉक्टर संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या मोहिमेची अंमलबजावणी केली जाणार आहे. हा उपक्रम ग्रामीण आणि नागरी भागातील महिलांसाठी आरोग्यदृष्टीने एक महत्वाचा मैलाचा दगड ठरेल. असा विश्वास आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला.